# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–०४

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) नोव्हेंबर–डिसेंबर २०२० पुरवणी परीक्षेची **आवेदनपत्रे ऑनलाईन** पध्दतीने **सादर करावयाच्या तारखांबाबत...**

## प्रकटन

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की,राज्यात कोविड–१९ या विषाणूचा प्रादुर्भावामुळे शासनाने लॉकडाऊन/संचारबंदी जाहीर केली होती व वेळोवेळी सदरचा कालावधी वाढवल्यामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२० परीक्षांचे निकाल माहे जुलै २०२० मध्ये जाहीर झालेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणारी पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्ट ऐवजी नोव्हेंबर–डिसेंबर २०२० मध्ये घेण्यात येणार आहे. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इ.१०वी व इ.१२वी साठी **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे.

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत **ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा** | माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाव्दारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळा,उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| **नियमित शुल्क** | मंगळवार, **दिनांक २०/१०/२०२०** ते गुरुवार, **दिनांक २९/१०/२०२०** | मंगळवार, **दिनांक ०३/११/२०२०** ते बुधवार, **दिनांक ०४/११/२०२०** | गुरुवार, **दिनांक ०५/११/२०२०** |
| **विलंब शुल्क** | शुक्रवार, **दिनांक ३०/१०/२०२०** ते सोमवार, **दिनांक ०२/११/२०२०** | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळा, उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, उच्च माध्य.शाळा/कनिष्ठ महाविदयालयाचे प्राचार्य यांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१.श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माहे नोव्हेंबर–डिसेंबर २०२० व फेब्रुवारी.– मार्च २०२१ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

२.ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरतांना फेब्रवारी –मार्च २०२० परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

३.नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

४.सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी शुल्क प्रचलित पध्दतीने मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये **Virtual Account** व्दारे जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

५.आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक– १९/१०/२०२०